नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २८४ Issue - 284 | वार रविवार दि. २ मार्च २०२५ Blow- Sunday Date 2 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा सूत्रधार वाल्मिक कराडच

## खंडणीत आडवे आल्याने संतोष देशमुख यांची हत्या, दोषारोप पत्रात वाल्मिक कराड यांच्यासह आठ जणांविरोधात पुरावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बीड : पवन उर्जा प्रकल्पात ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या ' आवादा' कंपनीकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागणारा वाल्मिक कराड यांचा आवाज आणि कंपनीतील कर्मचाऱ्यांचे आवाजाचे एकमेकांशी जुळणारे नमूने, हत्या प्रकरणातील आरोपींचा खंडणीशी गुन्ह्याशी असणारा सहसंबध दाखविणारे सीसीटिव्ही चित्रणे या ऐवजासह राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोषारोप पत्र दाखल केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुमारे १८० साक्षीदार, पंच यांच्या मदतीने तपासानंतर केल्यानंतर दाखल गुन्ह्यातील आरोपींचा सूत्रधार वाल्मिक कराड असल्याने त्यास पहिल्या क्रमांकाचा आरोपी बनविण्यात आले आहे. तपास अधिकारी बसवराज तेली यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या तपासातील ' डिजिटल' स्वरुपाचे पुरावे न्यायवैधक प्रयोगशाळेकडून तपासून दोषारोप तयार करण्यात आले आहे.

दोषारोप पत्रातील क्रमांक दोनचा आरोपी विष्णू चाटे याच्या दूरध्वनीवरुन २९ नोव्हेंबर रोजी वाल्मिक कराड याने खंडणी मागताना, ' अरे ते काम बंद करा, ज्या परिस्थितीमध्ये सुदर्शनने सांगितले त्या परिस्थिती ते बंद करा. अन्यथा त्याचे परिणाम गंभीर होतील. काम चालू केले तर याद राखा' असे धमकावले होते. पुढे याच प्रकरणात दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली. या सर्व आरोपींचे आवाजाचे नमुने व त्याचे मेमरी कार्ड पुरावे म्हणून दोषारोप पत्रात नोंदवले आहेत. मात्र आरोपी विष्णू चाटे याचा भ्रमणध्वनी नष्ट झाला असल्याचे दोषारोप पत्रात मान्य करण्यात आले आहे. मात्र, हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी क्रमांक सहा संतोष देशमुख यांना मारहाण करत असताना हसत आनंद साजरा करत असल्याचे छायाचित्रणही न्यायालयात सादर करण्यात आले आहे.



वाल्मिक कराड याला अटक केल्यानंतर त्याचा फिकट निळ्या रंगाचा आयफोन, सोनेरी रंगाचे अन्य दोन भ्रमणध्वनी संचही ताब्यात घेतले असून आरोपींशी झालेल्या संभाषणाच्या आधारे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे. संतोष देशमुखा यांची हत्या ज्या लोखंडी लोखंडी पाईप, त्याला करदोड्याने बांधून बनवलेली मूठ, आरोपीच्या काळ्या रंगाच्या गाडीत तसेच पाईपला लागलेले रक्ताचे डाग यांचे उल्लेखही दोषारोपामध्ये करण्यात आले आहेत. आरोपींचे मोबाईल, त्यांच्या गाडीत सापडलेले टी शर्ट, गॉगल, एटीएम कार्ड, प्रादेशिक परिवहन विभागाने गाड्यांसाठी दिलेले प्लास्टिकचे कार्ड अशा अनेक वस्तू तपासकामी ताब्यात घेतल्याचा दोषारोप पत्रात उल्लेख आहेत. खंडणीच्या गुन्ह्यात आडवे आले म्हणून संपवा अन्यथा आपण भिकेला लागू, असे म्हणत वाल्मिकच या गुन्ह्यातील सूत्रधार असल्याचे दोषारोपात म्हटले आहे. या आरोपींमधील सुदर्शन घुले आणि त्याचे साथीदार संघटित गुन्हेगारी करत होते. त्याने व त्याच्या साथीदाराने केज, अंबाजोगाई, धारुर व धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथे १० वर्षात ११ गुन्हे केले असल्याचे दोषारोपात म्हटले आहे.

असा आहे खंडणीच्या गुन्ह्याचा दोषारोप पत्रातील तपशील

आठ ऑक्टोबर २०२४ रोजी अवादा एनर्जी प्रा. लि. चे जमीन अधिग्रहण अधिकारी शिवाजी थोपटे हे वाल्मीक कराड यांचे सांगणे वरुन वाल्मीक कराड याच्या परळी येथील ऑफीसमध्ये जाऊन भेटले. त्यावेळी विष्णु चाटे हा हजर होता. या वेळी वाल्मीक कराड याने, कंपनी चालू ठेवायचे असेल तर दोन कोटी रुपये दया नाहीतर बीड जिल्हयातील अवादा कंपनीची सर्व कामे बंद करा अशी धमकी दिली. पुढे याच मागणीसाठी २९ नोव्हेंबर रोजी वाल्मिक अण्णाची डिमांड पूर्ण करा आणि भेट घ्या तोपर्यंत काम चालू करू नका अशी सुदर्शन घुले याने धमकी दिली. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी वाल्मीक कराड, विष्णु चाटे, सुदर्शन घुले, प्रतिक घुले, सुधीर सांगळे व कृष्णा आंधळे यांनी विष्णु चाटे याचे केज येथील कार्यालयात मिटींग घेवून अवादा एनर्जी प्रा. लि. कंपनी ०२ कोटी रुपये खंडणी देत नाही. त्याकरीता काय करावे लागेल याची चर्चा केली. यावेळी प्रतिक घुले, सुधीर सांगळे व कृष्णा आंधळे हे कटामध्ये सामील झाले.

वारंवार खंडणी मागुनही अवादा एनर्जी प्रा.लि. कंपनीने वाल्मीक कराडला खंडणी न दिल्यामुळे, दिनांक ०६/१२/२०२४ रोजी सुदर्शन घुले, प्रतिक घुले व सुधीर सांगळे हे अवादा एनर्जी प्रा. लि. कंपनीमध्ये गेले व तेथील सुरक्षा रक्षकास मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळ केली.

अवादा एनर्जी प्रा.लि. चे जमीन अधिग्रहण अधिकारी शिवाजी थोपटे यांना दोन कोटी रुपये दया नाहीतर कंपनी बंद करा. अशी धमकी देवुन शिवीगाळ व धक्काबुक्की केली. अवादा एनर्जी प्रा. लि. कंपनीमध्ये काम करणारे कर्मचारी यांनी फोन करुन सरपंचला सदर घटनेबाबत सांगितले. त्यावरुन मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हे त्या ठिकाणी गेले व संतोष देशमुख यांनी सुदर्शन घुले व त्यांचे साथीदारांना विनंती करुन, कंपनी बंद करु नका. लोकांना रोजगार मिळु दया असे सांगितले. त्यावेळी सुदर्शन घुले याने सरपंच संतोष देशमुख यांनी खंडणी मागण्यात अडथळा निर्माण करत असल्याने संतोष देशमुख यांना वारंवार सरपंच तुला बघून घेतो. जीवंत सोडणार नाही, अशी विष्णू चाटे धमकी देत होता.

दरम्यान ७ डिसेंबर रोजी रोजी सुदर्शन घुले याने वाल्मीक कराड यास कॉल केला त्यावेळी वाल्मीक कराड याने सुदर्शन घुले यास सांगितले की, जो तो उठेल आणि आपल्या आड येईल तर आपण भिकेला लागू असेच होत राहिले तर कोणतीही कंपनी आपल्याला खंडणी देणार नाही. आता जो कोणी आड येईल त्याला आडवा करावाच लागेल. कामाला लागा अशा सूचना केल्या. पुढे संतोष देशमुख यांची अमानुषपणे मारहाण करुन त्यांची हत्या करण्यात आली.

# इंदापूर मध्ये महसूल सहाय्यक महिलेला लाच घ्यावयाची लागली चांगलीच चटक

## लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून लाच स्वीकारताना बाईला झाली ना राव अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी:अतुल सोनकांबळे

घडे सर्व कांहीं या पैश्याच्या पाई..! पैश्यापुढे आंधळी झाली दुनिया कळेना भलाई बुराई..! पैशाला मिळे गीता पैश्याला कुराण... पैसा हवा म्हणून कुणी विकती ईमाण... पैसा हवा म्हणून कोणी लग्नाच्या पहिल्या रात्रीचा सोहळा विके.... तर पैसा हवा म्हणून कोणी पोटचा गोळा विके... पैश्याच्या पुढे आंधळी झाली दुनिया कळेना भलाई बुराई आन मग घडे सर्व काही या पैशाच्या पायी....

आसच आज इंदापूर तहसील कार्यालयात महसूल विभागात घडलेलं आहे.

इंदापूर तहसील कार्यालय येथे महसूल सहाय्यक म्हणून कार्यरत असलेल्या कावेरी विजय खाडे यांना शेतकऱ्याकडून २५ हजाराची लाच घेतल्याप्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. या २५ हजाराच्या लाचे मुळे महसूल विभागातील सरकारी नोकरी टांगणीला लागली आहे.?

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रेम वाघमारे यांनी दिलेल्या माहितीनुसार इंदापूर तालुक्यातील तक्रारदार यांच्या वडिलांची ३९ गुंठे जमीन आहे. त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हता. त्याबाबत सन २०२० पासून तहसीलदार यांच्याकडे दावा सुरू आहे.

याबाबत तहसीलदार इंदापूर यांची सुनावणी होऊन निकाल देणे बाबतची प्रक्रिया बाकी होती. सदर निकालाची कागदपत्रे तक्रारदाराच्या बाजूने तयार करून द्यावे म्हणून कावेरी विजय खाडे (वय- ४९ वर्षे) महसूल सहाय्यक वर्ग ३ तहसील कार्यालय इंदापूर, रा. संघवीनगर, भिगवन रोड, बारामती) यांनी ५० हजार रुपयाची लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती २५ हजार रुपये देण्याचे ठरले.

त्याबाबत संबंधित शेतकऱ्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुरूप शुक्रवार रोजी ५ वाजताच्या दरम्यान सापळा रचून संबंधित महसूल सहाय्यक कावेरी खाडे यांना २५ हजाराची लाच स्वीकारताना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दरम्यान सदरची कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलिस अधीक्षक शीतल जानवे, पोलीस उपाधीक्षक दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रेम वाघमारे, पोलीस हवालदार कैलास महामुनकर, वनिता गोरे, चंद्रकांत कदम यांनी केली.

# आरोपींना कठोर शिक्षा मिळेल : मुख्यमंत्री

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची गेल्या अनेक दिवसांपासून सर्वत्र चर्चा होत आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोषारोप पत्र दाखल केले आहे. ज्यामध्ये खंडणीत आडवे आल्याने संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच या प्रकरणात वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याचे उघड झाले आहे. दरम्यान गेल्या अनेक दिवसांपासून विरोधकांकडून तसेच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांकडून या प्रकरणातील आरोपींनी कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली जात आहे. या दरम्यान तपास अधिकाऱ्यांनी दोषारोप पत्र दाखल केल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी आरोपींना कठोर शिक्षा मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे,

ठाणे येथे माध्यमांशी बोलताना याबद्दल राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पोलिसांनी अतिशय प्रोफेशनल तपास केला आहे. नवीन कायद्याचा अवलंब करून योग्य वेळेमध्ये आणि संपूर्ण पुराव्यांसह आरोपपत्र दाखल केले आहे. आता आम्ही कोर्टालाही विनंती करणार आहोत की त्यांनी ही केस फास्ट ट्रॅकवर चालवावी. उज्वल निकम यांची आपण नियुक्ती केली आहे आणि मला विश्वास आहे की जे आरोपी आहेत त्यांना कठोरतम शिक्षा कोर्ट देईल, असे फडणवीस म्हणाले. पवन उर्जा प्रकल्पात ३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या 'आवादा' कंपनीकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागणारा वाल्मिक कराड यांचा आवाज आणि कंपनीतील कर्मचाऱ्यांचे आवाजाचे एकमेकांशी जुळणारे नमूने, हत्या प्रकरणातील आरोपींचा खंडणीशी गुन्ह्याशी असणारा सहसंबध दाखविणारे सीसीटिव्ही चित्रणे यासह राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने संतोष देशमुख हत्या प्रकरणातील दोषारोप पत्र दाखल केले आहे.

**३,२०० कोटी रुपयांच्या कामांना दिली स्थगिती**

# मुख्यमंत्री फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना आणखी एक धक्का

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात घेतलेल्या काही निर्णयांना विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थगिती दिली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा शिंदे सरकारच्या काळात आरोग्य विभागासाठी घेतलेला निर्णय स्थगित करण्यात आला आहे. माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या काळात दिलेले ३,२०० कोटी रुपयांचे काम रद्द करण्यात आले आहे.



एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना तानाजी सावंत यांच्याकडे आरोग्य खात्याची जबाबदारी होती. यावेळी अधिकाऱ्यांच्या बदल्या, रुग्णवाहिका खरेदी यामध्ये अनियमितता झाल्याचा आरोप केला गेला होता. तसेच आरोग्य विभागाच्या अंतर्गत येणारी सर्व शासकीय रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रे यांना बाह्य यंत्रणेद्वारे सापसफाई करण्याचे काम देण्यात आले होते. यासाठी प्रतिवर्षी ६३८ कोटी रुपये याप्रमाणे तीन वर्षांसाठी ३,१९० कोटी रुपयांचे कंत्राट पुण्यातील एका खासगी कंपनीला देण्यात आले होते. मात्र या कंत्राटाला आता स्थगिती देण्यात आली आहे.

दरम्यान या निर्णयावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात सुरू असलेले सुप्त द्वंद कारणीभूत असल्याचा संशय विरोधक व्यक्त करत आहेत. पण शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मात्र वेगळीच प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, सदर निर्णयामागे पक्षीय कारण नाही. फक्त आरोग्य विभागच नाही तर प्रत्येक सरकारी विभागाने नियमानुसार काम केले पाहीजे. आम्ही जनतेला उत्तरदायी आहोत.

दरम्यान शिवसेना (ठाकरे) पक्षाचे नेते संजय राऊत यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. ते म्हणाले, एकनाथ शिंदे यांच्या काळात जी कामे झाली, त्यात केवळ भ्रष्टाचारच झाला. शिंदेंच्या काळात आरोग्य मंत्री कोण होते, हे सर्वांना माहीत आहे. भाजपातून भ्रष्ट मंत्र्यांचा विरोध केले गेला होता. त्यापैकीच एक आरोग्य मंत्रीही होते. सार्वजनिक आरोग्य खाते थेट जनतेशी संबंधित असते. पण त्या खात्यात भ्रष्टाचार होत असेल तर योग्य नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा भ्रष्टाचार थांबवत असतील तर त्यांचे आम्ही स्वागतच करू.

# स्वारगेट एसटी स्थानक बलात्कार प्रकरण : गाडेची 'डीएनए' चाचणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : स्वारगेट बलात्कार प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी दत्तात्रय गाडे याचा जबाब पोलिसांनी नोंदविला, तसेच गाडेची ससून रुग्णालयात लैंगिक क्षमता चाचणी करण्यात आली. या चाचणीचा अहवाल सकारात्मक आल्याची माहिती सूत्रांनी दिली. आता गाडेची डीएनए चाचणी करण्यात येणार आहे.



स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारातील शिवशाही बसमध्ये प्रवासी तरुणीवर मंगळवारी (२५ फेब्रुवारी) बलात्कार करण्यात आल्याची घटना घडली. आरोपी गाडेने तरुणीकडे वाहक असल्याची बतावणी केली होती. तरुणीवर बलात्कार करुन पसार झालेल्या दत्तात्रय गाडे याला शिरुर तालुक्यातील गुनाट गावातून पोलिसांनी शुक्रवारी मध्यरात्री अटक केली गाडे सराइत असून, त्याच्याविरुद्ध पुणे ग्रामीण, शहर, तसेच अहिल्यानगर परिसरात सहा गुन्हे दाखल झाले आहेत. गाडेला न्यायालयाने १२ मार्चपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. त्यानंतर पोलीस कोठडीत असलेल्या गाडेचा जबाब शनिवारी पोलिसांकडून नोंदविण्यात आला, अशी माहिती परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील यांनी दिली. गाडे याला अटक करण्यात आल्यानंतर त्याला पुण्यात आणण्यात आले. ससून रुग्णालयात त्याची वैद्यकीय तपासणी तसेच लैंगिक क्षमता चाचणी करण्यात आली. लैंगिक क्षमता चाचणी अहवाल सकारात्मक आल्याची माहिती सूत्रांनी दिली. गाडेची डीएनए चाचणी करण्यात येणार आहे. त्याच्या रक्ताचे नमुने घेण्यात आले आहेत. रक्त आणि केसांचे नमुने डीएनए चाचणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. याप्रकरणात सखोल तपास करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. गुन्हे शाखा, तसेच स्वारगेट पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत आहे. आरोपी गाडेने प्रवासी तरुणीवर शिवशाही बसमध्ये बलात्कार केला. न्यायवैद्यक प्रयोगशाळेतील तज्ज्ञांनी बसची पाहणी केली आहे. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून, बस न्यायवैद्यक प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आली आहे.

# सीईटीच्या अर्जात दुरुस्तीची विद्यार्थ्यांना संधी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिक्षणशास्त्राअंतर्गत येणाऱ्या बी.एड (सामान्य व विशेष), बीएड इलेक्टेड, बीएड-एमएड, एम एड या अभ्यासक्रमांना तर शारीरिक शिक्षणशास्त्राअंतर्गत येणाऱ्या बी.पी. एड, एम.पी.एड या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जामध्ये बदल करण्याची संधी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांना ३ ते ५ मार्चदरम्यान आपल्या अर्जाच्या तपशीलात दुरुस्ती करता येणार आहे. त्याचबरोबर अर्धवट असलेले अर्ज किंवा शुल्क भरणे शक्य न झालेल्या विद्यार्थ्यांनाही या कालावधीत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत बी.एड (सामान्य व विशेष), बीएड इलेक्टेड, बीएड-एमएड, एमएड आणि बी.पी.एड, एम.पी.एड या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा मार्चमध्ये होणार आहे. त्यानुसार या अभ्यासक्रमांसाठी अर्ज नोंदणी प्रक्रिया २८ फेब्रुवारीपर्यंत राबविण्यात आली होती. मात्र अर्ज भरताना अनेक उमेदवारांकडून विविध प्रकारच्या किरकोळ चुका झाल्या आहेत. त्या दुरुस्त करता याव्यात यासाठी संधी देण्याची विनंती अनेक विद्यार्थी व पालकांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे ईमेल द्वारे किंवा प्रत्यक्ष कार्यालयाला भेट देऊन केली होती. त्यानुसार विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या विनंतीची दखल घेऊन त्यांना अर्जातील तपशीलांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी संधी देण्याचा निर्णय राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार बी.एड (सामान्य व विशेष), बीएड इलेक्टेड, बीएड-एमएड, एमएड आणि बी.पी. एड, एम.पी.एड या अभ्यासक्रमांचे अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अर्जातील वैयक्तिक माहितीत काही चुका असतील तर त्या सुधारता येतील.

# नवे शैक्षणिक धोरण ; सावधान! संस्कृतचा भाषिक फाशीवाद येतो आहे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राला आपल्या बोलीभाषांचे कौतुक नाही. संवर्धनाची काळजी नाही बोलीभाषांचा अभिमान बाळ-गावा अशी आस्थाही नाही ज्या बोलीभाषा महाराष्ट्राच्या प्रादेशिक विविध विभागात आहेत त्यांच्याबद्दल अभिमानाने अस्मिता वाढताना दिसत नाही मालवणी भाषा वराडी भाषा खानदेशी भाषा वैदर्भीय भाषा पश्चिम महाराष्ट्रातील राकट भाषा या भाषांच्या संवर्धनाबद्दल तिच्या आजच्या स्वरूपाबद्दल तिच्या अभिव्यक्तीबद्दल तिचा संवाद प्रक्रियेमधील वापराबाबत महाराष्ट्रामध्ये प्रचंड उदासीनता दिसून येते. प्रादेशिक बोलीभाषा या अशाच मृत पावत चालले आहेत नामशेष होत आहेत. भाषेचा पराभव हा आक्रमक पद्धतीने होत असतो. भाषा सूत्र हे त्याला कारणीभूत आहे. भाषा प्रथम पराभूत होते नंतर त्या भाषेचा भाषिक पराभूत होतो सांस्कृतिक प्रभुत्व त्यातून लादले जाते भाषिकांचा अर्थ करण्याची त्या असलेला संबंध तोडला जातो आणि त्यातूनच भाषा निरोपयोगी होते, आणि आक्रमण वाद्यांच्या भाषा या स्थानिक भाषिकांच्या जनजीवनाम ध्ये ज्ञानाचा अहंकार बाळगून त्या स्वीकाराव्या लावल्या जातात आणि यासंच मराठीमध्ये भाषिक फाशी वाद असे म्हणता येते .महाराष्ट्रा सह सर्व राज्यात भाषिक फाशीवादामध्ये अनेक कालखंड गेला आहे. महाराष्ट्रात तर ज्ञानबंदी अक्षरबंदी पठणबंदी उच्चार बंदी होती त्यामुळे कित्येक पिढ्या संस्कृत प्रभुतवाद्यांनी नष्ट केले आहेत त्याची खंत महाराष्ट्राला किती आहे ?हा एक मोठा प्रश्नच आहे.

महाराष्ट्राच्या प्रादेशिक बोलीभाषांचे महात्म्य साहित्यातून वाढताना दिसत नाही. कादंबरी नाटक चित्रपट या सर्व कलाप्रकारांमध्ये म हाराष्ट्रातील विविध भाषांचे सर्वेक्षण आणि त्यांच्या आजच्या अभिव्यक्तीचे अस्सल स्वरूप श्रवणाच्या पातळीवर वाचनाच्या पाचव्या वर पहावयास एकत्रितपणे मिळत नाही. ही आजची उणीव आहे. भाषिक अभिमान बाळगताना आपल्या सभोवतालची अनास्था महाराष्ट्र समजावून घेताना दिसत नाही, आणि त्यामुळे म हाराष्ट्रात संस्कृत तायजेशनचा फाशी वाद लवकरच येणार आहे .असे भविष्य कथन केले तर तो दूरवर्तनाचा प्रकार ठरवण्यात येईल ,परंतु भाषिक फाशीवाद हे संकट संस्कृत भाषिकांच्या समरस्तवाद्यांनी हिंदुत्ववाद्यांनी राज्यकर्त्यांनी आता आपल्या दारात आणून ठेवले आहे. एवढे तरी महाराष्ट्र समजून घेईल तर बरे होईल हा भाषिक वादाचा विषय संस्कृतीशी प्रभुत्वाशी ज्ञान व्यवहाराशी अर्थकारणाशी आणि समाजाच्या एकूण राजकीय सत्तेच्या सर्वोच्च षड्यंत्राशी संबंधित आहे. म्हणून थोडे भाषिक फाशीवादाचे आजचे स्वरूप काय आहे हे विश्लेषण करण्याचा इथे प्रयत्न केला आहे.



महाराष्ट्र हा दिल्ली ईश्वराच्या पुढे सतत लोटांगण घालण-ारे इतिहासकालापासूनचे राज्य आहे .इथे उत्तरेकडून आलेल्या सगळ्या आदेश ,आज्ञा हुकूम ,सूचना पालन करण्यात इथल्या सगळ्या क्षेत्रातील व्यक्तींनी राज्यहिताचा विचार केलेला नाही, एकूण राज्याचा सांस्कृतिक राजकीय आवाज काय म्हणतो याचे आकलन इथे या क्षेत्रा-तील व्यक्तींना नाही आणि धैर्य तर अजिबात नाही. त्यामुळे केंद्राला विरोध करण्याचे धाडस महान म हाराष्ट्राने अनेक वेळा दाखवलेले नाही याची उदाहरणच म्हणजे नवे शैक्षणिक धोरण २०२० हे आपसूकपणे स्वीकारणारे राज्य शैक्षणिक दृष्ट्या प्रगत असलेले राज्य या धोरणातील सामाजिक विषमता आणि पुनरुपी प्रस्थापित होणारी जातीय व्यवस्था याबद्दल जो धूर्त धोरणामध्ये सरचित करण्यात आला आहे. त्याला विरोध होण्याची गरज होती तथापि नव्या शैक्षणिक धोरणाचे स्वागत करणारे हे राज्य आपल्या भविष्यातील भाषिक संघर्षाबद्दल शैक्षणिक संस्थांच्या उध्वस्त कार्याबद्दल काय भविष्यात मांडून ठेवले आहे याचा विचार करत नाही. असे म्हणावे लागते?

तूर्तास महाराष्ट्रात त्रिभाषा सुद्धा बद्दल काय भूमिका आहे? महाराष्ट्राचे भाषा धोरण काय आहे ?येऊ घात-लेली संस्कृत आणि मातृभाषा मराठी आणि राष्ट्रीय भाषा हिंदी आणि इंग्रजी यांच्या या स्वीकृती धोरणामध्ये मराठीचे काय होणार याची चिंता? कोणी सांगेल का?

केंद्र सरकार जी राज्य नवे शैक्षणिक धोरण राबवणार नाहीत. त्यांचा समग्र शिक्षा अभियानाचा निधी राखून ठेवत आहे तो त्यांना देत नाही त्यातून भारतात उद्भव-लेला भाषावादाचा संघर्ष हा समजून घेणे .खूप महत्त्वाचे आहे त्रिभाषा सूत्र आणि द्विभाषा सूत्र ही स्वातंत्र्यपूर्व काळातील मोठी लढाई होती. तिचा इतिहास असा आहे. की १९६८ च्या शैक्षणिक धोरणामध्ये तीनभाषा सूत्र सुचवण्यात आले त्यामध्ये हिंदीला भारतभर मान्यता देण्यात आली. हिंदी भाषिक राज्यांच्या मधील हिंदीचा प्रभाव अध्यापनातील तिचा वापर आणि भाषिकांची संख्या हा घटक विचारात घेण्यात आला होता. त्यानंतर याच वादाचे स्वरूप भेटले गेले दक्षिणेकडे ला अनेक राज्याने हिंदीच्या स्वीकृतीला विरोध केला ,आणि त्यातून त्या राज्यात भाषिक दंगली झाल्या त्या दंगलीत तामि ळनाडूमध्ये ७० तामिळी भाषिकांनी हौतात्मे पत्करले होते. थालमुत्त आणि नटराजन या दोघांनी भाषिक वादाच्या चळवळीला प्रारंभ केला होता. प्रारंभी त्यांचेच होताटॅम व तामिळ विरुद्ध हिंदी या संघर्षाला कारणीभूत झाले.

तामिळनाडू ने नव्या शैक्षणिक धोरणाला विरोध केला आहे. म हाराष्ट्राने नवे शैक्षणिक धोरणाची स्वीकृती केली आहे महाराष्ट्राच्या भाषा सूत्रामध्ये एक वाक्यता नाही. तामिळनाडू ने द्विभाषा सूत्र केंद्राने स्वीकारावे दक्षिणेच्या राज्यांच्या वर त्रिभाषा सूत्राचा अन्याय करू नये अशी मागणी मोठ्या प्रमाणात चाल-वली आहे.

खरे तर राज्यकर्ते गेले त्यांच्या भाषा मात्र स्थानिक वसाहतव-ादी राष्ट्रांच्या मध्ये संघर्षाची कारणे बनून राहिल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात १९३७ पासून हिंदीचा अमल स्थानिक भाषिकांची भाषा राज्यकर्त्यांना समजणारी मदतीची भाषा म्हणून इंग्रजी बरोबर या भाषेचा स्वीकार हिंदी भाषिक पट्ट्यात सुरू झाला आणि तेव्हापासूनच ब्रिटिश सरकारने लागू केलेले भाषा सूत्र अमान्य असल्याबद्दल तत्कालीन राज्यपाल राजाजी यांनी याबद्दल राजीनामा दिल्याचा इतिहास तामि ळनाडूमध्ये अभिमानाने कथन केला जातो .भारतीय संसदेने १९६७ मध्ये भाषा धोरणाबद्दल कायदा करून जी सुधारणा केली त्यानुसार प्रशासकीय भाषा धोरण १९६८ मध्ये म्हटले आहे की तीन भाषा सूत्रांच्या भाषा धोरणाम ध्ये हिंदी ही एक असावी याचाच दक्षिणेकडच्या राज्याने हिंदी लागण्याचा प्रयत्न असा सांस्कृतिक विरोधाचा अर्थ घेऊन त्यांनी आपल्या तामिळी भाषेचे व इंग्रजी भाषेचे संवर्धन आणि सशक्तिकरण स्वातंत्र्य उत्तर काळामध्ये मोठ्या प्रमाणात केलेले पहावयास मिळते ,त्यांच्या एकूण हिंदी विरोधामध्ये बोलीभाषिकांची भाषा ही हिंदीम ुळे दुय्यम होते. ती उपेक्षित रा-हते. ती व्यवहारातून बाजूला पडते अर्थकारणामध्ये ती वापरली जात नाही आणि त्यामुळे मुळात भाषिक अस्मि ता व सांस्कृतिक ओळख असलेल्या त्या त्या भाषिकांच्या राज्याची सं प्रभू ता नष्ट होते. हा त्यांचा सांस्कृतिक राग आहे. आग्रह आहे. हे महाराष्ट्राने आपल्या मराठी भाषेच्या संदर्भात तरी समजावून घ्यावे महाराष्ट्रात हिंदी मराठी इंग्रजी हे भाषा सूत्र आहे. परंतु यामध्ये हिंदीचा ज्ञान व्यवहाराशी कितपत फायदा झाला हिंदी मुळे मराठीचे सक्षमीकरण होण्यास मदत झाली का हिंदी मुळे पर्यायी शब्दांचा संग्रह मराठीत वाढला का ?हिंदी म राठी भाषिकांना संपादन होऊन त्यांचे भाषा विश्व समृद्ध झाले का? हिंदीच्या भाषिक संपादनामुळे त्यांची सृजन प्रतिभा विकसित झाली का सर्व ज्ञान व्यवहार हिंदी मध्ये होत आहेत का? याचा आज विचार केला तर महाराष्ट्र मध्ये अस्कलित हिंदी नाही. अभिजात मराठीचा प्रचार आणि वेग वाढत नाही मराठीचे क्लासिकल स्वरूप सर्व क्षेत्रात वाढताना दिसत नाही, आणि तरीही त्रिभाषा सूत्राचा महाराष्ट्राच्या मराठी भाषिकांच्या सांस्कृतिक व्यवहारावर कोणता परिणाम झाला याचा विचार करताना कोणत्या संस्था विद्यापीठे दिसत नाहीत .ही आजची अवस्था आहे.

दक्षिणेकडच्या तामिळनाडूसह अनेक राज्य १९६८ चे अमलात आणलेले भाषण सूत्र बदलण्यास विरोध करीत आहेत हा रास्तविरोध दिसून येतो २०१९ मध्ये या संस्कृत भाषेचा दक्षिणेवरील वर्चस्व वाढवण्यासाठी चाललेला प्रयत्न रोखण्यासाठी तामिळनाडू हा पुढे आला आहे. त्यांच्या मते नव्या शैक्षणिक धोरणात हिंदीचा स्वीकार करण्याची अट ही दुरुस्त करण्यात यावी हा त्यांच्या मागणीचा मुख्य भाग आहे ही मागणी किती दूरगामी आहे किती सांस्कृतिक दृष्ट्या योग्य आहे? आणि राजकीय हत्यार म्हणून हिंदीला कसे वापरले जात आहे? म्हणून त्याला विरोध करणे किती रास्त आहे? ही चर्चा भाषिक संघर्षाच्या अनुषंगाने खूप महत्त्वाची आहे जात भाषा तुरुंग ही सत्ताधाऱ्यांची हत्यारे आहेत .असे राम मनोहर लोहियांनी तत्कालीन संघर्षाच्या वेळी मोठ्या तीव्रतेने भारतभर पोचवले होते. हा सर्व भाषिक संघर्षाचा इतिहास म हाराष्ट्राच्या दृष्टीने अक्षम्य उपेक्षेचा आहे.

भाषिक संघर्षाचे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टाईल यांनी हा वाद दक्षिण भारतातील सर्व राज्यांना आ-वाहन करून पुढे नेण्याचे जाहीर केले आहे धर्मेंद्र प्रधान यांना हिंदी भाषा लादण्याचे प्रयत्न करू नये त्यासाठी दक्षिणेकडच्या राज्यांची सहमती घडवून एकमत केंद्राला कळवण्याचा त्यांचा चाललेला प्रयत्न हा महाराष्ट्रात समजून घेतला जात नाही. कारण विद्यमान महाराष्ट्राचे सरकार दिल्ली ईश्वराच्या अधिन आहे. हे आहे उलट दक्षिण राज्य व त्यांनी

नुकताच चालवलेला विरोध आणि त्यामधील वाद हे मराठी भाषिक आणि समजावून घेणे खूप महत्त्वाचे आहे. त्यांच्या मते प्रा-चीन भाषा आणि त्यांचे संचित हे संस्कृतच्या भाषिक आक्रमणामुळे नष्ट होणार आहे. संस्कृत लादने म्हणजे संस्कृतचा भाषिक फाशीवाद हा दक्षिणेकडच्या राज्यांवर लागून त्यांचा सांस्कृतिक ठेवा नष्ट करणे सांस्कृतिक वेगळेपण नष्ट करणे भाषिक संचित नष्ट करणे आणि बोलीभाषेची अस्मि तेची ओळख प्राचीन काळापासून जी चालत आली आहे ती दुर्लक्षित करून उत्तरेकडच्या हिंदी आणि संस्कृतच्या प्रभावाखाली दक्षिणेचे राजकारण आणणे हा दुष्ट हेतू त्यामध्ये आहे. असा दक्षिणेच्या राज्यांची तक्रार आहे

संस्कृतचा भाषिक फाशीवाद हा मातृभाषेची प्राचीन वैशिष्ट्य नष्ट करणार आहे. व मातृभाषिकांना संस्कृतच्या भीती दहशतीखाली ठेवून एक आध्यात्मिक प्रभुत्व संस्कृतीचे संप्रदायाचे लागण्याचा अप्रत्यक्ष भाषा धोरणातून प्रयत्न आहे .हे त्यांचे विरोधाचे कारण खूप महत्त्वाचे वाटते.

भाषावाद हा लक्ष विचलित करण्याचा प्रकार आहे भ्रष्ट आपहारी प्रशासन चालवताना देशात भाषिक वाद तयार करून समाजाला अंधारात ठेवण्याचा हा प्रकार आहे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी नमूद केले आहे की हिंदी ने भारतातील उत्तर प्रांतातील अनेक भाषांना गिळून टाकले आहे त्यामध्ये भोजपुरी, मैथिली, अवधी, ब्रज, बुंदेली, घरवाली, मागही, मारवाडी, छत्तीसगृही, संथाली, अंगीका, हो, खऱ्रिया, कोर्टा, कुरुमाली, कुरुख, म ुंडारी त्या त्या भाषिकांच्या भाषा आज नामशेष होताना दिसत आहेत त्या टिकून ठेवणे अवघड झाले आहे याची मूळ कारण हिंदी ही भाषा भाषिकांची सुलभ भाषा बोलीभाषा राजभाषा याच्या नावाखाली स्वीकारून या प्रा-चीन मातृभाषा या नामशेष होत आ-हेत. हे द्विभाषा सूत्र लागू करणाऱ्या केंद्र सरकारने समजावून घ्यावे असे आग्रह दबाव वाढवण्यात आला आहे यामध्ये सत्यांश असून याचा अनेक अंगांनी विचार करण्याची गरज आहे.

हिंदी भाषा लादणे म्हणजे त्या त्या भाषिकांच्या मूळ सांस्कृतिक अस्मिता नष्ट करणे आणि त्यांचे राजकीय सपाटीकरण करणे आणि संस्कृतचा अध्यात्मिक प्रभुतवादी फाशीव-ाद इतर भाषिकांच्या लादणे आणि त्यांचा ज्ञान व्यवहार नष्ट करणे होय .हे भाषेचे हत्यार केंद्र सरकार नावे शैक्षणिक धोरणाच्या निमित्ताने आता वापरत आहे ,आणि संस्कृतीकरण म्हणजे संस्कृतचा वर्चस्व भाषिक स्वीकृतीच्या नावाखाली सर्व देशभर लाजणे हा छुपा झेंडा महाराष्ट्रामध्ये समजून घेतला जात नाही. याचा विरोध होत नाही. याची चर्चा होत नाही. याची सत्यता तपासली जात नाही महाराष्ट्राच्या ११ कोटी बांधवांच्या मध्ये संस्कृत बोलणारे दहा हजार ही नागरिक नाहीत. असे असताना शिक्षण क्षेत्रात चोर पावल-ाने आणण्यात आलेली संस्कृत भाषा आणि तिचा फाशीवाद हा मराठीच्या अनेक बोलीभाषांचे मरण ठरणार आहे. मराठीचा प्राचीन वारसा अद्याप उजागर करून संशोधकीय पद्धतीने मांडण्याचे काम अपूर्ण असताना .हा भाषिक राजकारणाचा व्यवहार पुढे रेटला जातो आहे. हे महाराष्ट्राच्या भाषिक आणि समजावून घेण्याची नितांत गरज आहे.

नव्या शैक्षणिक धोरणात संस्कृत भाषा लागू करणे म्हणजे विशिष्ट वर्गाला संस्कृतच्या अध्यापनाचे अर्थ करण्याचे काम मिळणे आणि पुन्हा त्यांचा संस्कृतचे अध्यापक व व्यवहार करते म्हणून सर्व ज्ञान सत्तेवर प्रभुत्व त्यांचे हातात देणे असा हा धूर्त डाव आहे. आज संस्कृतचे संशोधक नाहीत. विद्वान भाष्यकार नाहीत आणि तरीही महाराष्ट्रात संस्कृतचे स्वागत होते आहे नुकताच बहुजन म हाराष्ट्र मराठी समृद्ध पद्धतीने शिकतो. आहे .वाचतो आहे. लिहितो आहे .बोलू पाहतो आहे. साहित्याच्या क्षेत्रात तो अक्षर वाटांच्या वर चालू आहे. अशा वेळेला संस्कृत भाषा ही नवा फाशीवाद महाराष्ट्रावर नव्हे तर दक्षिणेकडच्या सर्व राज्यांवर नव्या शैक्षणिक धोरणाच्या निमित्त-ाने लादला जातो आहे. हे समजावून घेतले गेले पाहिजे संस्कृतची बंदी अक्षरबंदी ते होती आणि त्यामुळेच सांस्कृतिक गुलामी येथे निर्माण झाली संस्कृत ने केलेले भाषिक अत्याचार आणि त्यामुळे निरक्षर भारत निर्माण का झाला ?याची कारणे पुढे यायचे आहेत. यातून कोणते जैन बौद्ध पाली अर्धमागधी या ज्ञान व्यवहारातील म ोठ्या संचित धनाचे नष्टीकरण झाले हे पण अद्याप बाहेर यायचे आहे . अशा वेळेला संस्कृतचा भाषिक फाशीवाद आपसूकपणे महाराष्ट्र स्वीकारतो आहे. हे मराठीचे पुढचे मरण मानावे का तारण मानावे हे कळत नाही.? यावर चर्चा होईल मंथन होईल आणि म राठी विचार प्राचीन समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन होईल यासाठी भाषिक सूत्रांच्या वर राजकीय पक्ष भाषिक संस्था काही भूमिका घेतील आणि त्यातील नवनीत न्याय सार्वत्रिक हिताचे हे पुढे येईल तर हा भाषा प्रेमाचा कर्तव्याचा भाग मानता येईल .अन्यथा बोला चीच कडी बोलाचाच भात असे मराठी भाषिकांचे वर्तन नेहमीप्रमाणे होत राहील. हे होऊ नये असे मनोमन वाटते म्हणून द्विभाषा सूत्र त्रिभाषा सूत्र नवे शैक्षणिक धोरण २०२० यांच्या भाषा राजकारणाचा हा एक अंतरंग स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**– शिवाजी राऊत, सातारा**

# शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या ओजस बालसंस्कार वर्गाचा पालक मेळावा व विविध गुणदर्शन समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी: अतुल सोनकांबळे

शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्ष श्रीमती पद्मताई भोसले, सचिव डॉ. गिरीश देसाई, खजिनदार श्री. तुषार रंजनकर आणि विश्वस्त श्री. अरविंद गाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या ओजस बालसंस्कार वर्गाचा पालक मेळावा आज दिनांक १ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नैतिक आणि बौद्धिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

कार्यक्रमाची सुरुवात आदरणीय शंकररावजी पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि दीपप्रज्व-लनाने झाली. यानंतर संस्थेचे आरोग्य विभाग प्रमुख श्री. महादेव चव्हाण यांनी पालकांना संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक, आरोग्यविषयक आणि कौशल्यविकास उपक्रमांबद्दल माहिती देत ओजस बालसंस्कार वर्गाचा उद्देश स्पष्ट केला. ओजस बालसंस्कार वर्गाचे प्रशिक्षक श्री. सागर कांबळे यांनी या उपक्रमाची संकल्पना, गरज आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात त्याच्या म हत्त्वाबद्दल पालकांना मार्गदर्शन केले.




विद्यार्थ्यांनी नृत्य, कविता वाचन, गीत गायन आणि विविध सांस्कृतिक कला सादर करत आ-पले कौशल्य दाखवले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या म ाध्यमातून शिकून स्वतः तयार केलेली नृत्ये सादर केली. पालकांनी आपल्या मुलांना व्यासपीठ मि ळत असल्याचा आनंद व्यक्त केला आणि अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, असे मत मांडले.

संस्थेचे विश्वस्त श्री. अरविंद गाटकर यांनी अध्यक्षीय भाषण करताना पालकांना आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रम ांचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, शिस्त आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी बालसंस्कार वर्ग उपयुक्त ठरतील, असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त श्री. अरविंद गारटकर,आरोग्य विभाग प्रमुख श्री. महादेव चव्हाण, संस्थेचे सल्लागार श्री. हमीदभाई आतार, संस्थेचे इन्चार्ज श्री. दीपक जगताप, तसेच अनेक पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केदार गोसावी, अथर्व सरोदे, अभिजित तळेकर, सनी भुजबळ यांनी सहकार्य केले.

ओजस बालसंस्कार वर्ग दर शनिवारी संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत इंदापूरमधील प्रसिद्ध संगणक प्रशिक्षण संस्था 'अल्फा बाईट' च्या हॉलमध्ये पूर्णपणे मोफत घेतले जातात.संस्थेच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिम त्त्व विकासाला चालना मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश मिडीयम स्कुलचे वार्षिक स्नेह संम्मेलन उत्साहात संपन्न

## चिमुकल्यानी पालकांची मने जिंकली आणि पालकांनी मनमुराद आनंद लुटला






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूलचा वार्षिक स्नेह सम्मेलन संपन्न झाला यामध्ये ण घ ऋ व ङ घ ऋच्या विद्यार्थीन-ींनी व विद्यार्थी यांनी रसिकांची मने जिंकली खुप चांगले अभियन केले आणि डान्सची धूम ठोकली. पालकांनी मनमुराद आनंद लुटला.

प्रथमता रयतेचे राजे बहुजन प्रतीपालक छत्रपती शिवाजी म हाराज महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्य प्रतिमेच पुजन करण्यात आले यावेळी कार्यक्रम ाचे उदघाटन डॉ स्नेहा सुरवसे यांच्या हस्ते फित सोडुन झाले।

तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका कविता पाटील ह्या होत्या प्रमुख पाहुणे डॉ यशवंत नरवडे, चिकुंद्रा गा-वचे माजी सरपंच राजेंद्र गरड , अशोकराव केसकर , शुभांगी गायकवाड तर सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीरा वऱ्हाडे जेष्ठ पत्रकार विलास येडगे , बंडु कसेकर , अदिजन उपस्थित होते. प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष मारुती खारवे यांनी केले. आलेल्या सर्व पाहुण्याचे स्वागत पर सत्कार डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कुलचे संस्थापक तथा मुख्य प्रवर्तक मारुती खारवे यांनी केले. विद्यार्थांच्या कला गुणांना वाव मिळावा म्हणून स्पेशल हा विविध गुण दर्शनच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते या स्नेह सम्मेलनात मराठी हिंदी कोळीगीत , लोकगीत , लावणी , भक्तीगीत , भावगीत , भिमगीत चित्रपटगीत , बालगीत देशभक्ती पर गाण्यावर आगदी सुंदर नृत्य सादरीकरण करत चिमुकल्यांनी पालकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक जनक गायकवाड यांच्या सह इयत्ता नववीतील विद्यार्थीनी समिक्षा चव्हाण व नगमा काझी यांनी केले . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

**थोडक्यात...**



## प्रेस मीडिया लाईव्ह तर्फे सरिता प्रकाश जाधव यांची रणरागिणी पुरस्कार साठी निवड

पुणे : येथील पत्रकारिता क्षेत्रातील प्रसिद्ध वृत्तसंस्था प्रेस मीडिया लाईव्ह तर्फे नवे दानवाड ता, शिरोळ, जिल्हा कोल्हापूर येथील सौ सरिता प्रकाश जाधव ग्रामपंचायत सदस्य यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना रणरागिणी पुरस्कार साठी निवड करण्यात आली आहे..

प्रेस मीडिया लाईव्ह चा राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळा सांगली येथे २० एप्रिल रोजी दुपारी १२ ते ०३ या वेळेत संपन्न होणार आहे..

# कुसुमाग्रज हे साहित्य क्षेत्रातील सूर्याप्रमाणे चमकणारा तारा : आ. सत्यजीत तांबे

## एस. बी. देशमुख यांना कवी कुसुमाग्रज आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कुसुमाग्रज यांच्या नावे त्यांच्या जन्मदिनी त्यांच्या गावी उपक्रमशील शिक्षकांना कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार देऊन शिक्षकांना प्रेरणा देण्याचे काम आयोजकांनी केले आहे कुसुमाग्रज सन्मान हा शिक्षकांसाठी प्रेरणादायी असून उपक्रमशील शिक्षकांना प्रोत्साहित करणारा आहे असे गौरव उद्गार नाशिक विभाग पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित दादा तांबे यांनी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या गावी नाशिक जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण प्रसंगी बोलताना व्यक्त केले.



नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव - एस बी देशमुख यांचें शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान असून २०२३ चा स्वच्छ शाळा सुंदर शाळा राज्यात प्रथम क्रमांक मिळाला असुन पंचतारांकीत शाळा म्हणुन घोषीत झाली आहे. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्ताने त्यांना कुसुमाग्रज आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

मराठी गौरव भाषा दिनाचे औचित्य साधुन नाशिक जिल्ह्यातील शिरवाडे वणी या कविवर्य कुसुमाग्रज यांच्या गावी हा पुरस्कार देण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून खासदार भास्कर भगरे, कादवा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन शिवाजी दादा बस्ते, दिलीपराव धारराव, कर्मवीर राजाराम सखाराम वाघ शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष शहाजी दादा सोमवंशी, बापूसाहेब पाचोरकर, बापूसाहेब पाटील, सरपंच काळे, भाऊसाहेब भालेराव, राज्य शिक्षक नेते काळोजी बोरसे, योगेश साळुंखे, प्राचार्य व्ही जे जाधव, प्राचार्य डी बी ढिकले, सौ सविता देशमुख, एम डी काळे, वृषाली सानप आदि मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश सलादे यांनी केले* तर स्वागत उपाध्यक्ष विजय पवार, ज्ञानेश्वर कावळे, समाधान गांगुर्डे, मृणाल वैद्य, सरला जाधव, जयश्री पवार यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती तेजस्विनी कावळे, मीनाक्षी मोरे, कुमारी सानिका खैरे यांनी केले आभार सतीश सोनवणे व दिनकर रसाळ यांनी मानले.

# संस्कार प्री स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : मुलांमध्ये देशभक्ती वाढावी व रुजवावी या दृष्टिकोनातून देशभक्तीपर अनेक गीत व त्याचे नाट्य स्वरूपातील सुंदर रित्या संस्कार प्री स्कूल येथील विद्यार्थ्यांनी सादर केले. यावेळी संस्थेच्या संचालिका रुपाली शहा यांनी या कार्यक्रमाचे थीम थोर स्वातंत्र्य सेनानी अशी ठेवल्या.



लोकापुरे मंगल कार्यालय अक्कलकोट येथे संस्कार प्री स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.तत्पूर्वी श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध दंत तज्ञ डॉ. विवेक करपे, पत्रकार चेतन जाधव, संस्थेचे अध्यक्ष डॉ. विपुल शहा, विशाल वाली उपस्थित होते. डॉ.विपुल शहा यांनी यावर्षीचा स्टुडन्ट ऑफ द इयर हा अवॉर्ड जाहीर केले होते. सोशल ऍक्टिव्हिटी ड्रॉइंग्स, भाषण कौशल्य, क्रीड़ा, या निकषांवर हे पारितोषिक कोणाला द्यायचे हे ठरविले जाते.यंदाचा पारितोषक मास्टर विशाल वाली यांना मिळाला.

या कार्यक्रमाची सुरुवात झाडांना पाणी देऊन करण्यात आला.पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये मुलांमध्ये वृक्ष प्रेमाची आवड निर्माण व्हावी हाच दृष्टिकोन ठेवून अशा प्रकारे पूजन करण्यात आले.असे संचालिका रुपाली शहा यांनी म्हणाल्या.या कार्यक्रमासाठी संस्कार फ्री स्कूलच्या शिक्षक, अन्नपूर्णा रामशेट्टी, सपना तेलूंगी, शिवानी लिंबीतोट, दीपिका मुसले, निलोफर शैख़, रजनी मंजुले यानी परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन पाटील यांनी केले. तर आभार संचालिका यांनी मांडले.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विवेक जाधव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव : सुधाकर रणदिवे, जय भिम प्रतिष्ठान, धाराशिव (उस्मानाबाद) आयोजित विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त ठरल्या प्रमाणे दिनांक २८/२/२०२५ रोजी शासकीय विश्राम गृह, एसपी ऑफिस समोर भिमजयंती २०२५ ची पुर्व नियोजित बैठक झाली.

यात जय भिम प्रतिष्ठान चे प्रमुख मार्गदर्शक मा.भैय्यासाहेबजी नागटिळे, मा.गोपीशेठ बनसोडे, मा. आण्णाशेठ गायकवाड, आकाश भैय्या बनसोडे, मोन्याभाई बोकेफोडे, दत्ताभाऊ सोनवणे, कुंदन भाईजी वाघमारे , यांच्या अध्यक्षतेखाली

भिमजयंती २०२५ ची कार्यकारणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती च्या अध्यक्ष पदी विवेक जाधव, उपाध्यक्ष- राज सुरते, सचिव- सनी जगताप, सहसचिव- मंगेश वाघमारे कोषाध्यक्ष- आकाश गंगावणे यांची निवड करण्यात आली.

यावेळी जय भिम प्रतिष्ठान चे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मीटिंग झाल्याच्या नंतर मोठया उत्साहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मीटिंगचा समारोप झाला.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांची विशेष तपासणी मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्य शासनाने संपूर्ण राज्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांची विशेष तपासणी मोहीम या योजनेची घोषणा केली आहे. त्यानुसार सदरच्या मोहिमेचा शुभारंभ संपूर्ण राज्यात दि. ०१ मार्च रोजी इंदिरा गांधी मॉडेल स्कूल औंध, पुणे येथून उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री. प्रकाश अबिटकर यांच्या हस्ते सकाळी ८.३० वाजता मोहिमेच्या उद्घाटनापासून झाला . या उद्घाटन कार्यक्रमास प्रत्येक जिल्ह्यातील एक शाळा व तालुकास्तरीय एक शाळा दुरभाष्य प्रणालीद्वारे या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित झाले होते.



सदर मोहिमेचा उद्घाटन कार्यक्रम आदर्श प्राथमिक विद्यालय पंढरपूर येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आमदार अभिजीत पाटील,आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी पंढरपूर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश कुमार सुडके., डॉ एकनाथ बोधले तालुका आरोग्य अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. चारुदत्त शितोळे आदर्श प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक श्रीमती घंटी मॅडम , तालुक्यातील अशा कार्यकर्त्या तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची उपस्थिती होती.

**आदर्श प्राथमिक विद्यालय पंढरपूर येथे मोहिमेचे उद्घाटन**

या कार्यक्रमाचे आयोजन आदर्श प्राथमिक विद्यालय शिक्षकवृंद व राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथकातील डॉ. कुलदीप डोके, डॉ. धनंजय सरोदे, डॉ. आबा गायकवाड, डॉ.किरण वहिल यांनी केले.

या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाची व्याप्ती व उद्दिष्ट या बद्दल उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश कुमार सुडके यांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी डॉ. राहुल सावंत यांनी सूत्र संचालन केले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमअधिकारी डॉ. संभाजी भोसले यांनी आभार मानले.

या प्रसंगी अंगणवाडी तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य करण्यात आली. असल्याचे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम पथक उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर यांनी सांगितले आहे.

# नवरंगे बालकाश्रम संस्थेला शासनाचा 'बालस्नेही पुरस्कार'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर :- वा.बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर या संस्थेला महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या बालस्नेही पुरस्कार २०२४ साठी उत्कृष्ट बालगृह या नामांकनासाठी पुणे विभागातून निवड झाली आहे.

हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंट मुंबई येथे दिनांक ३ मार्च २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता पार पडणार आहे. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांची उपस्थितीत राहणार आहे. अनौरस बालकाशिवाय आई वडीलांपैकी कोणाचाही मृत्यू, दारिद्रय, आई वडील विभक्त होणे आदी कारणामुळे निराधार गृहहीन होणारी मुले व मुलींना या संस्थेत प्रवेश दिला जातो. संस्थेत दाखल झालेपासून मुल, मुलीची पहिल्या दिवसापासून ते ही मुले सर्वार्थाने स्वतःच्या पायावर उभे राहीपर्यंत त्यांची जबाबदारी ही संस्था घेते. आतापर्यंत अनेक अनाथ निराधार मुले मुली यांचे समाजात दत्तक देवून चांगले पुनर्वसन केलेले आहे. या कार्याची दखल घेऊन शासनाचा बालस्नेही पुरस्कार जाहीर केलेला आहे. महाराष्ट्रात व विशेषतः सोलापूर जिल्ह्यांत ही संस्था १४९ वर्षे महिला व बाल कल्याण क्षेत्रात सामाजिक कार्य करीत आहे.

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ अंतर्गत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील लाभार्थ्यांसाठी थेट कर्ज योजना**

# शासनाकडून थेट कर्ज योजनेत एक लाख रुपयापर्यंत लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील दारिद्रय रेषेखालील गरजू घटकांचा आर्थिक उन्नतीसाठी, तसेच त्यांना स्वंयरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने, महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या थेट कर्ज योजने अंतर्गत कर्जाची मर्यादा रक्कम रु. २५ हजार वरुन रक्कम रु.१ लाख पर्यंत वाढविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर. ए. चव्हाण यांनी केले आहे.

थेट कर्ज योजनेची प्रकल्प मर्यादा रक्कम रु.१ लाख करण्यात आली असून यामध्ये महामंडळाचा हिस्सा रु.८५ हजार (८५%), अनुदान रक्कम रु.१० हजार (१०%), अर्जदाराचा सहभाग रु.५ हजार (५%) असे एकूण रु. १ लाख (१००%), ३ वर्ष (३६ महिने) या कालावधीसाठी द.सा.द.शे.४% व्याज दराप्रमाणे कर्ज रक्कम वितरीत करण्यात येणार आहे. सदर योजने अंतर्गत रक्कम रु.१ लाख पर्यंतचे प्रकल्प मर्यादपर्यंत असलेले लघु उदयोग करता येतील.

थेट कर्ज योजना (रक्कम रु.१ लाख) राबविणेकरिता जिल्हा निहाय उद्दिष्ट, अटी शर्ती नियम निकष व पात्रतेसह परिपत्रक प्राप्त झाले आहे.

**उद्दिष्ट वितरण :-** सदर योजनेत साधारणपणे पुरुष ५०% व महिला ५०% आरक्षण राहील.

ग्रामिण भागासाठी प्राधान्य राहील, राज्यस्तरावरील क्रिडा पुरस्कार व्यक्तीना प्राध्यान राहील, सैन्य दलातील वीरगती प्राप्त वारसाच्या घरातील एका सदस्यास प्राधान्याने लाभ देण्यात येईल.

* सदर योजनेच्या पात्रता व निकष :- अर्जदार मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा जातीतील असावा, अर्जदार महाराष्ट्रातील रहीवाशी असावा, अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे, अर्जदाराने यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा, अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रु.३ लाख (तीन लाख) यापेक्षा जास्त नसावे, एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल, अर्जदाराने अर्जासोबत आधारकार्ड जोडलेल्या बँक खात्याचा तपशिल सादर करावा, अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव/प्रशिक्षीत असावा, अर्जदाराचा उळलळश्र ऊीशवळीं डलेीश ५०० च्या वर असावा.

**कर्ज मागणी अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे व दस्तऐवज खालीलप्रमाणे.:-** जातीचा दाखला (सक्षम अधिकारी यांच्याकडून घेतलेला असावा), अर्जदाराच्या कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला (रु.३ लाख पर्यंत), नुकतेच काढलेले फोटो (दोन), अर्जदाराचा शैक्षणिक पुरावा/शाळेचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड, पॅनकार्ड, ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे, त्या जागा उपलब्धेचा पुरावा (भाडे पावती, करारपत्र), व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र व अनुभव दाखला, यापूर्वी शासकीय कर्ज योजनेचा व अनुदानाचा लाभ न घेतल्याचे प्रमाणपत्र ॲफोडेण्टीसह, शॉप ॲक्ट/ग्रामसेवकाचे व्यवसाय करण्यास ना हरकत दाखला, कोटेशन (व्यवसाया संदर्भात साहित्य/भाल खरेदीचे दरपत्रक), अर्जदारास महामंडळाच्या प्रचलित नियमानुसार व्यवसायास अनुरुप असलेली आवश्यक ती कागदपत्रे प्रमाणपत्रे/करारपत्रे कर्ज मागणी अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

**कर्ज प्रक्रिया :-** कर्ज प्रकरण कार्यालयाकडे प्राप्त झाल्यास, परिपूर्ण असे कर्ज प्रस्ताव लाभार्थीच्या निवडीसाठी, प्रथम लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेसाठी व मंजूरीस्तव सादर करण्यात येतील, प्राप्त झालेले कर्ज प्रस्तावाची संख्या उदिष्टांपेक्षा जास्त असल्यास, लाभार्थीची निवड चिठ्ठीव्दारे (लॉटरी पध्दतीने) करण्यात

**जिल्हा कार्यालय सोलापूर मार्फत थेट कर्ज योजनेमध्ये कर्ज मागणी अर्ज वितरण दिनांक १ मार्च २०२५ ते दिनांक १५ मार्च २०२५ पर्यंत करण्यात येणार असून व कागदपत्रांच्या पुर्ततेसह दिनांक १ मार्च २०२५ ते दिनांक १५ मार्च २०२५ रोजी पर्यंत अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही करण्यात येणार आहेत.**

येईल, अर्जदाराच्या उळलळश्र ऊीशवळीं डलेीश ५०० च्या वर आहे किंवा कसे याबाबत कर्ज मंजूर झाल्यानंतर अहवालसादर करावा लागेल, कर्ज मंजूरीची प्रक्रिया झाल्यानंतर कर्ज प्रकरणी कर्ज वसुलीसाठी दोन सक्षम जामिनदार घेण्यात येतील, (०१)- जामिनदार-शासकीय/निमशासकीय नोकरदार/अनुदानीत संस्था मधील कर्मचारी असावा, त्यांचे कार्यालयाकडून वसुलीसाठी हमीपत्र प्यावे लागेल. (जामिनदार कागदपत्रे-रु.१०० बॉन्डबर प्रतिज्ञापत्र, कार्यालयाचे ओळखपत्र, मागील ०३ महिन्याचे पगार पत्रक, मागील ०६ महिने बैंक स्टेटमेंट पासबुक झेरॉक्स, आधारकार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड झेरॉक्स, ०२ फोटो.इ.), जामिनदार- मालमत्ताधारक जमीनदार असावा, त्यांचे मालमत्तेवर महामंडळाच्या नावे कर्जाचा बोजा नोंद करावा लागेल. (जामिनदार कागदपत्रे ७/१२किंवा ८-अ उत्तारा, आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅन कार्ड, रु.१०० बॉन्डवर प्रतिज्ञापत्र व इ.), सहभाग रक्कमेपोटी रु.५ हजार चा धनाकर्ष महामंडळाचे नावे जमा करावा लागेल, कर्ज वितरणापुर्वी लाभार्थीकडून वसुलीपोटी २० उत्तर दिनांकित धनादेश घेण्यात येतील, कर्जदाराच्या वारसाचे रु.१०० च्या बॉन्डवर वारसदार म्हणून प्रतिज्ञापत्र, इतर वैद्यानिक दस्ताऐवनांची पुर्तता करणे बंधनकारक आहे, ३ वर्ष (३६ महिने) कालावधीसाठी द.सा.द.शे.४% व्याज दराने कर्ज रक्कम वितरीत केली जाईल.

तरी इच्छुक मांग, मातंग, मिनी-मादीग, मादीग, दानखणों मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग गारुडी, मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील गरजू व होतकरुनी महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेव आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, शासकीय विश्रामगृहाच्या पाठीमागे, बोग बजार समोर, सोलापूर येथे मूळ जातीचा दाखला, आधारकार्ड व इतर कागदपत्रासह स्वतः उपस्थित रहावे, त्र्यस्थांकडे अर्ज दिला जाणार नाही किंवा अर्ज स्विकारला जाणार, या करिता कार्यालयात स्वतः प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहणे बंधनकारक आहे. असे आवाहन श्री आर.एव चव्हाण, जिल्हा व्यवस्थापक आर. ए. चव्हाण यांनी केले आहे.

# काळाराम मंदिर सत्याग्रहाच्या वर्धापनदिनी उद्या नाशिकमध्ये बौद्ध धम्म परिषद : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## बौद्ध धम्म परिषदेस राज्यभरातील आंबेडकरी जनता; बौद्ध अनुयायी उपस्थित राहणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहाच्या ९५ व्या वर्धापन दिनी उद्या रविवार दि.२ मार्च रोजी नाशिक मधील हुतात्मा अनंत कान्हेरे गोल्फ क्लब मैदान येथे राज्य स्तरीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे.या बौद्ध धम्म परिषदेत देशभरातील बौद्ध धम्म गुरू; बौद्ध अभ्यासक उपस्थित राहणार आहेत.या बौद्ध धम्म परिषद रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना.रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेत आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेचे स्वागत अध्यक्ष रिपब्लिकन पक्षा-




चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे राहणार आहेत. या बौद्ध धम्म परिषदेस राज्यभरातील आंबेडकरी जनता ; बौद्ध अनुयायी उपस्थित राहणार आहेत.

या बौद्ध धम्म परिषदेचा प्रारंभ पूज्य भिक्खू संघाच्या नेतृत्वात सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण करून होणार असून दुपारी २.३० वाजता धम्म संस्कार विधी होणार आहे.त्यानंतर दुपारी ४ वाजता जाहीर धम्म सभा आयोजित करण्यात आली असून बौद्ध धम्म परिषदेच्या धम्म सभेचे अध्यक्षस्थानी केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले उपस्थित राहणार असून यावेळी पूज्य भिक्खू संघातील भदंत सुगत महाथेरो; डॉ राहुल बोधी महाथेरो आणि अनेक पूज्य भिक्खू या धम्म परिषदेत उपस्थित राहणार आहेत.

बौद्ध धम्म परिषदेच्या जाहीर धम्म सभेत केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले अध्यक्षस्थानी असून प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; केंद्रीय मंत्री किरण रिजिजू; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे; उपमुख्यमंत्री अजितदादा पवार; माजी मंत्री छगन भुजबळ; मंत्री गिरीश महाजन; मंत्री दादा भुसे; मंत्री राधा कृष्ण विखे पाटील; मंत्री माणिकराव कोकाटे; मंत्री नरहरी झिरवाळ आदी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

रिपाइं चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे या धम्म परिषदेच्या स्वागत अध्यक्ष असून राज्यभरातील आंबेडकरी जनतेने; बौद्ध अनुयायांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बौद्ध धम्म परिषदे च्या संयोजकांनी केले आहे.

# मुंबई येथे होणाऱ्या मांगवीर महामोर्चा मध्ये हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा : कॉम्रेड गणपत भिसे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी

लोहा जिल्हा नांदेड येथील शासकीय विश्राम गृहावर मातंग समाजाची बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मातंग युवा जोडो अभियानाचे अध्यक्ष बाळूभाऊ लोंढे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून लाल सेना संस्थापक अध्यक्ष कॉम्रेड गणपत भिसे होते.

लोहा तालुक्यातील जास्तीत जास्त समाज बांधव मुंबई येथे ५ मार्च रोजी होत असलेल्या मांगवीर महामोर्चा ला घेऊन जाण्याचा निर्धार करण्यात आला आहे.



यावेळी कॉम्रेड हनमंत कंधारे लाल सेना युवा जिल्हा अध्यक्ष नांदेड, यादव कंधारे, शिवहर गालफाडे, श्याम वाघमारे, संतोष दाढेल, सुरेश दाढेल, मारुती दाढेल, दत्ता पंदलवाड,किरण दाढेल,किशोर दाढेल, सामाजिक कार्यकर्ते तुकाराम जी दाढेल, दर्शन बंडेवार, वैभव दाढेल, छोटूभाऊ दाढेल, शिवशंकर वाघमारे, दीपक आंबटवार, प्रमुख उपस्थित मध्ये सिद्धांत भिसे हेमंत साळवे किशोर कांबळे अशोक तात्या उबाळे व लाल सेनेचे संस्थापक अध्यक्ष कॉम्रेड गणपत भिसे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन तुकाराम दाढेल यांनी तर आभार प्रदर्शन सचिन दाढेल सर यांनी केले.

मांगवीर महामोर्चा संदर्भातील भूमिका कॉम्रेड गणपत भिसे यांनी मांडली व मांग वीरांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही या साठी आपण सर्व समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने ५ मार्चला मुंबई आझाद मैदानावर मांगवीर महामोर्चात सहभागी व्हावे असे आव्हान केले.

# रेशन कार्डधारकांना पुन्हा एकदा केवायसी करण्यासाठी ३० मार्च पर्यंत मुदतवाढ : हेमंत ढोकले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब: सुधाकर रणदिवे अन्नसुरक्षा योजना अंतर्गत गरीब गरजूंना मोफत रेशन व स्वस्त धान्याचा पुरवठा होतो त्या योजनेचा लाभ घेणाऱ्या शिधापत्रिकाधारकांना सरकारने ई-केवायसी करण्याची अट घातली होती, या योजनेतील बनावट लाभार्थ्यांना शोध ई- केवायसी तुन लागणार आहे ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदत होती अनेक कार्डधारकांनी ई- केवायसी न केलेल्याने ३० मार्च २०२५ पर्यंत परत एकदा सरकारने मुदत वाढ करण्यात आली आहे या अगोदर अनेक वेळा ई केवायसी करण्यासाठी सरकारने मुदत वाढवून देण्यात आली होती तरीपण शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांनी आज तगायत ई केवायसी पूर्ण न केल्याने परत एकदा सरकारने ई केवायसी करण्यासाठी मुदत वाढ देण्यात आली आहे असे कळंब तहसील कार्यालयाकडून माहिती देण्यात आली आहे. तर ३० मार्च २०२५ पर्यंत ई केवायसी करून घेण्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी मा.स्वाती शेंडे,सह जिल्हा पुरवठा अधिकारी मा.निकिता साकळे, कळंब तहसीलदार मा.हेमंत ढोकले,पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती.शिल्पा माळवे, सहाय्यक महसूल अधिकारी श्री. आर.डि. पवार यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत स्वस्तातील व मोफत धान्य मिळवण्यासाठी सर्व रेशन कार्ड धारकांना व ऑनलाइन असलेल्या रेशनकार्डातील प्रत्येक सदस्याचे ई केवायसी करण्यासाठी सरकारने बंधन घातले आहे अन्न आणि सार्वजनिक मंत्रालयाने यापूर्वी अनेक वेळा निर्देश दिले आहेत मात्र तरीदेखील अनेक शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी प्रकिया पुर्ण केली नाही त्यामुळे ३० मार्च २०२५ पर्यंत आपापल्या रेशन दुकानात जाऊन शिधापत्रिकेतील सर्व सदस्यांनी ई केवायसी करून घेणे आवश्यक आहे तसेच मोबाईल प द्वारे या दोन्ही प्रकारे ई केवायसी करता येईल त्यासाठी केंद्र सरकारने मेरा ई केवायसी मोबाईल प सुरू करण्यात आले आहे तरी या याचा वापर करण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून मेरा ई केवायसी मोबाईल प डाऊनलोड करून इन्स्टॉल करून घ्यावे व आधार फीस आरडी सर्व्हिस प डाऊनलोड करून इन्स्टॉल करून घ्यावे त्यानंतर मेरा ई केवायसी मोबाईल प उघडल्यानंतर त्यामध्ये राज्य निवडून व ठिकाण टाकावे त्यानंतर आधार क्रमांक टाकल्यानंतर ओटीपी मोबाईलला प्राप्त होईल सदर ओटीपी



रखण्यात टाकावा सदर सर्व माहिती भरल्यानंतर सबमिट बटनला क्लिक करावे त्यावेळी मोबाईल स्क्रीनवर दिसणारी माहिती सबमिट करावी अशी माहिती तहसील कार्यालयाकडून पत्रकार द्वारे करण्यात आली आहे जर शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी नाही केली तर रेशनचे धान्य मिळणार नाही तसेच अशा शिधापत्रिका धारकांची नावेही रेशन कार्डामधुन वगळले जाणार आहेत तर शिधापत्रीकेत नावे असलेल्या प्रत्येक सदस्याने आपल्या क्षेत्रातील रास्त भाव दुकानात जाऊन आधार कार्ड घेऊन ई-केवायसी करुन घ्यावी किंवा मोबाईल प द्वारे करून घ्यावी अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी मा. स्वाती शेंडे, सह जिल्हा पुरवठा अधिकारी मा .निकिता साकळे, कळंब तहसीलदार मा.हेमंत ढोकले,पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती.शिल्पा माळवे,सहाय्यक महसूल अधिकारी श्री.आर डी पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

> **कळंब तालुक्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानातील ई-पॉश मशिनद्वारे व मोबाईल प द्वारे प्रत्येक शिधापत्रिका धारक आणि कुटुंबातील सदस्यांची केवायसी करून घ्यावी फक्त आधार क्रमांक टाकून हि प्रक्रिया पूर्ण केली जाते. हि प्रक्रिया पूर्ण न करणाऱ्या लाभार्थ्यांचे रेशन बंद होऊ शकते व रेशन कार्डातून नाव वगळण्याची शक्यता आहेत जर ई केवायसी नाही केली तर याची सर्वस्वी जबाबदारी कार्डधारकांची असणार आहे त्यामुळे ३० मार्च २०२५ पर्यंत सर्व शिधापत्रिका धारकांनी सर्व सदस्यांचे ई- केवायसी करून घ्यावी.**
>
> **- श्रीमती. शिल्पा माळवे**
> **पुरवठा निरीक्षण तहसील कार्यालय कळंब**

# निफाड येथे क्रीडा सह्याद्रीच्या वतीने राष्ट्रीय खेळाडूंचा शिवरत्न क्रीडा पुरस्काराने गौरव




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशन नाशिक व क्रीडा सह्याद्री निफाड व टेनिस क्रिकेट असोसिएशन नाशिक आयोजित श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त राज्य व राष्ट्रीय खेळाडूंना सरस्वती विद्यालय निफाड येथे शिवरत्न क्रीडा गौरव पुरस्कार -२०२५ देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलालजी चोरडिया, सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती बागडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.या वेळी माजी.उपमुख्याध्यापक बाळकृष्ण ठोके. विजय बाळकृष्ण डेर्ले मुख्याध्यापक जि.प. प्राथ.शाळा जळगाव,राहुल कुलकर्णी, विनोद गायकवाड , शिव अविष्कार स्पोर्ट्स फांऊंडेशन चे अध्यक्ष विलास गायकवाड ,रमेश वडघुले ,संजय बागुल यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशन अध्यक्ष विलास गायकवाड यांनी खेळाडूना मार्गदर्शन केले व क्रीडा क्षेत्रामध्ये आपण करिअर करू शकता हे सांगितले. प्रमुख पाहुणे बाळकृष्ण ठोके व विजय डेर्ले यांच्या हातून विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अनंती आहेर ,पियुषा अहिरे ,पलक पवार,पुर्वा निकम , वेदश्री कापडणीस , नूतन काकुळते ,जानव्ही नेरकर, वेदिका केकान, हर्षल भूषण ठोके, उत्कर्ष नितीन ठाकरे, श्लोक गणेश आहेर ,शिव प्रवीण ठोके, सोहम भूषण कापडणीस, आयुष गणेश भदाने, शौर्यर सुनील चव्हाण, आयुष पंकज बागुल, आदित्य गोरक्षनाथ धारराव, खुशाल योगेश भामरे, करण राम रसाळ, साहिल संजय प्रसाद, आर्यन जितेंद्र खरे, स्मित घुमरे, राम रुपेश पाटील, प्रसाद विजय पवार, साई गोरक्षनाथ हलवार, रितेश रुपेश पाटील, रुद्राक्ष पंकज सोनवणे, साईराज रामेश्वर गोजरे, वेदांत प्रमोद गुरव, सोहेल शाहिद मुजावर, युवराज दिपक काळे, आदित्य गोरख पाटील, अभिजीत विश्वजित बोरसे, तेजस भाऊसाहेब जोंधळे, मानवराजे वाघ, कार्तिक मोरे, विजय घोटेकर , श्लोक कुलकर्णी, दक्ष विनोद गायकवाड, कुमार अवदेश कुमार साह, जय सुधाकर डबाळे,ओम संजय आहेर , सोहम भिमराज मोरे, कार्तिक मोरे, आदित्य वाघ,सिद्धेश मेमाणे, रागिनी आहेर इ.सर्व खेळाडूंना शिव रत्न क्रीडा पुरस्कार देऊन

सन्मानचिन्ह, गौरवपदक, मानाचा फेटा अशा स्वरूपात मान्यवरच्या शुभहस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. .तसेच या खेळाडूं महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनचे सचिव मीनाक्षी गिरी ,क्रीडा सह्याद्री नाशिक अध्यक्ष विलास गायकवाड यांनी या सर्व खेळाडूंचा अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलम बेंडकुळे यांनी केले व आभार विलास गायकवाड यांनी मानले

# जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन आंतर जिल्हा बदलीची सुरुवात सन २०१७ सालापासून झाली. तेव्हापासून आतापर्यंत आंतरजिल्हा बदलीचे एकूण सहा टप्पे पूर्ण झाले आहेत. शिक्षकांच्या अंतर जिल्हा बदली प्रक्रियेमधील होणारा भ्रष्टाचार व वर्षानुवर्षी लालफितीत अडकणारी प्रक्रिया ऑनलाइन बदली धोरणामुळे थांबली.. दरवर्षी माहे एप्रिल /मे महिन्यामध्ये बदली इच्छुक शिक्षकांना आपल्या स्वजिल्ह्यात बदलीने जाण्याचे वेध लागतात.वेगवेगळ्या जिल्ह्यात कार्यरत पती-पत्नी यांच्या कौटुंबिक जीवनात स्थैर्य आणण्याचे काम या आंतरजिल्हा बदलीच्या माध्यमातून होते. विशिष्ट कालावधी पूर्ण केल्यानंतर शिक्षकांना बदलीपात्र म्हणून समजले जाते. बदलीच्या माध्यमातून विधवा, कुमारिका, घटस्फोटीत-महिला शिक्षिकांना स्व-जिल्ह्यात जाता येते. वर्षानुवर्षे इतर जिल्ह्यातील सेवा केल्यानंतर स्वजिल्ह्यात बदली हा जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. परंतु आंतरजिल्हा बदलीच्या सातव्या टप्प्यात मध्यंतरीची लोकसभा व विधानसभा निवडणूक व त्या अनुषंगाने आलेली आचारसंहिता यामुळे खंड पडला होता. यामुळे आंतरजिल्हा बदली इच्छुक शिक्षकांमध्ये थोडीशी धाकधूक पाहायला मिळाली परंतु राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाने याबाबत ग्राम विकास विभागाच्या मंत्री महोदयांची यांची भेट घेऊन त्यांचे ओएसडी आदरणीय श्री नारायण गोरे साहेब यांना याबाबतची निवड लक्षात आणून दिली. याचबरोबर महाराष्ट्रातील विविध आमदाराचे पत्रही ग्रामविकास विभागाला प्राप्त झाले.याची दखल घेऊन सर्व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिनांक १० मार्च ते ६एप्रिल २०२५ पर्यंत आंतरजिल्हा बदलीच्या करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक शासनाकडून देण्यात आले आहे.शासनाच्या या निर्णयाचे राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या वतीने स्वागत करण्यात आले असून बदली इच्छुक शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले आहे.

> **शासनाकडून वेळापत्रक जाहीर- राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या मागणीला यश**

> **सर्व बदली इच्छुक शिक्षकांच्या बदल्या होण्यासाठी जिल्हावार रिक्त पदांची माहिती प्रत्येक जिल्हा परिषदेने अचूक कळविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर जिल्हानिहाय रोष्टर अपूर्ण असल्याने काही जिल्ह्यातील बदली प्रक्रिया पूर्ण होत नाही त्यासाठी राज्यरोष्टर हा एकमेव पर्याय संघटनेसमोर आहे. भविष्यात त्यासाठी मोठा लढा उभारावा लागणार आहे. त्याचबरोबर काही जिल्हा परिषदा बदली होऊनही सदर शिक्षकांना कार्यमुक्त करत नाहीत त्याबाबत ही ठोस धोरण शासनाने अवलंबिन्याची गरज आहे.**
>
> **- संतोष भोजणे राज्य सरचिटणीस**
> **राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्य**



करावयाची कार्यवाही व त्यासाठी कालावधी

१) शिक्षकाची माहिती पोर्टलवर अद्यावत करणे १० मार्च २०२५ पर्यत.

२)जि.प.ने बिंदू नामावल्या तपासून घेणे व पोर्टलवर रिक्त पदांची माहिती अपलोड करणे ११ मार्च ते १३ मार्च २०२५ पर्यत.

३) शिक्षकांना अर्ज भरण्याची सुविधा--१४ मार्च ते २०मार्च २०२५ पर्यत.

४) अर्जाची पडताळणी-- २१ मार्च ते २५ मार्च २०२५ पर्यंत.

५) न्यायालयीन प्रकरणे विभागीय आयुक्त अपील प्रकरणी तपासणी-- २६ मार्च ते २७ मार्च २०२५ पर्यंत.

६) आंतर जिल्हा बदली प्रक्रिया पूर्ण करणे -२८ मार्च ते ६ एप्रिल २०२५ पर्यंत.

**कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रतिपादन**

**विद्यार्थ्यांनी वेळेचा योग्य उपयोग करावा**

# विद्यार्थ्यांनी कौशल्ये विकसित करणे आवश्यक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आजच्या युगात केवळ गुणपत्रके महत्त्वाची नाहीत, तर विद्यार्थ्यांनी कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. समाज आणि उद्योग क्षेत्राला उत्तम तंत्रज्ञानाची जाण असलेले तज्ञ हवे आहेत. विद्यार्थ्यांनी नोकरीच्या शोधात वेळ घालवण्याऐवजी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यावर भर द्यावा. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांच्या यशामध्ये अडथळे निर्माण होत आहेत, त्यामुळे वेळेचा योग्य उपयोग करावा. असे प्रतिपादन डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ विजय फुलारी यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंदचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते.

यावेळी आमदार अभिजीतआबा पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, ब्रँडेड वस्तू वापरण्यापेक्षा आपण स्वतःच ब्रँड बनावे. शिक्षणामुळे डोळसपणा आणि व्यवहारिक ज्ञान मिळाले पाहिजे. करिअरवर लक्ष केंद्रित करून अमर्यादित संधींमध्ये वाटचाल करणे गरजेचे आहे.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना आवाहन करताना सांगितले की, फक्त एका विषयात पदवी घेऊन भागणार नाही, तर विविध क्षेत्रांमध्ये कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. नोकरी मागणारे न होता नोकरी देणारे बना.

या कार्यक्रमात राष्ट्रीय, राज्यस्तरीय, विद्यापीठस्तरीय व विभागीय विविध स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी झालेल्या स्पर्धांतील विजेत्या संघांचा देखील गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत प्रा. डॉ. बाळासाहेब बळवंत यांनी केले, तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. अमर कांबळे यांनी करून दिला. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य आमदार अभिजीत आबा पाटील, डॉ. जे. जी. जाधव, जी. बी. धायगुडे, डॉ. राजेंद्र जाधव, उपप्राचार्य डॉ तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य डॉ राजेश कवडे आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. प्रशांत नलावडे आणि प्रा अनिल परमार यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमर कांबळे व डॉ. प्रशांत नलावडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. उमेश साळुंखे यांनी मानले. प्रा. अनिल परमार, प्रा. विठ्ठल फुले आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.